ISSN 2278-8808
UGC APROVED SR. NO. 49366
SJIF 2016 = 6.177
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# व्यापक मानवतावादाचा काव्यमय अविष्कार : बाबुराव बागूल याची कविता

**प्रा. राजेंद्र आचार्य, Ph. D.**

*मराठी विभागप्रमुख, द.ग.तटकरे महाविद्यालय, माणगांव – रायगड ४०२१०४*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

१. **प्रस्तावना :–**

बाबुराव बागूल हे (१७ जुलै १९३० –२६ मार्च २००८) हे वास्तववादी कांदबरीकार, विद्रोही दलित कथांचे प्रमुख उद्गाते, उपेक्षित, शोषित, झोपडपट्टीतील, फुटपाथवरील भणंग जनजीवनाचे भेदक चित्रण करणारे लेखक म्हणून ओळखले जातात. प्रभावी व विद्रोही भाषाशैली, जिवंत प्रसंगचित्रण, कारूण्य आणि क्रुरता रेखाटन हे त्यांच्या लेखनाचे विशेष गुण आहेत. त्यांचे प्रकाशित साहित्य खालीलप्रमाणे –

**कांदबरी** – अघोरी १९८३
अपूर्वा
कोडी २००२
पावशा १९७१
भूमिहीन
मूकनायक
सरदार
सूड

**कथासंग्रह**

जेव्हा मी जात चोरली होती १९६३
मरण स्वस्त होत आहे १९६९

**कविता संग्रह :**

वेदाआधी तू होतास

**वैचारिक :**

आंबेडकर भारत भाग १ व २

दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान

**२. सन्मान व पुरस्कार**

१. धारावी मुंबई येथे ७ फेब्रुवारी १९९९ रोजी भरलेल्या पहिल्या विद्रोही साहित्य सम्मेलनाचे अध्यक्षपद

२. कविवर्य कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार २००७

३. महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार

स्वातंत्र्योत्तर काळातील १९६० नंतर मराठी साहित्यात आढळून येणारा एक ठळक प्रवाह म्हणजे दलित साहित्य. हा प्रवाह पारंपरिक साहित्याहून एक वेगळा साहित्यप्रकार आहे. या प्रवाहामुळे मराठी साहित्याचे दालनही समृध्द झाले आहे आणि मराठी साहित्याच्या कक्षा रूंदावला गेल्या आहेत. म्हणून दलित साहित्य हा मराठी साहित्यातील एक महत्वाचा प्रवाह ठरतो. सामाजिक परिवर्तनवादी वातावरण या काळात होते. त्यामुळे बाबुराव बागूल यांना आपण खूप लिहावे असे वाटू लागले. कथा, कांदबरी कविता लिहावी, भाषणे करावीत, सशस्त्र क्रांती करावी असे खूप काही करावे असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी आपले कविताक्षेत्र लहान वाटू लागल्यामुळे आपली वाटचाल कवितेकडून कांदबरीकडे वळविली व 'कोंडी' नावाची पहिली कांदबरी लिहली. त्यानंतर भोगलेल्या विचारांना मूर्तरूप देण्यासाठी पुढे ते कथा लिहू लागले. जेव्हा मी जात चोरली होती. (१९६३) व मरण स्वस्त होत आहे (१९६९) सूड ही दीर्घकथा (१९६७) साली लिहली.

१९६० नंतर बाबुराव बागूल यांनी आपल्या साहित्यातून दलितांच्या जीवनाचे वास्तवदर्शी भेदक चित्रण केलेले दिसून येते. दलित साहित्य विषयक व्यापक भूमिका स्वीकारताना विषमता आणि आर्थिक शोषण यामुळे दलित जीवन उद्ध्वस्त होते. अशा दृष्टिकोनातून ते दलित जीवनाचे चित्रण करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्सच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर दिसून येतो. शोषित, पिडीत माणूस आपल्या साहित्याचा ते केंद्र बिंदू मानतात. देश, देव, धर्म, वेद यापेक्षा माणूस श्रेष्ठ आहे माणसाची महत्ता आणि त्यांचे मोठेपणा त्यांनी आपल्या 'वेदा आधी तू होतास' या कवितेत आणि सूड या कादंबरीतून सांगितले आहे ते म्हणतात –

वेदा आधी तू होतास
वेदाच्या परमेश्वराआधी तू होतास
तूच सूर्याला सूर्य म्हटले
आणि सूर्य, सूर्य झाला
तूच चंद्राला चंद्र म्हटले
आणि चंद्र, चंद्र झाला
अवघ्या विश्वाचे नामकरण तू केलेस

हे प्रतिभावान माणसा

तूच आहेस सर्व काही

तुझ्यामुळेच सजीव सुंदर

झाली ही मही''

अशा व्यापक मानवतावादाच्या भूमिकेतून दलितांच्या जीवनाचे ते चित्रण करतात. दलितांच्या दु:खाची कारणमिमांसा करताना जन्मजात अस्पृश्यता, अस्पृश्यतेचा पारिपाक, दारिद्रिय, विषम समाजरचना, मानवी स्वभाव इ. कारणे सांगून इथल्या रूढी–परंपरा समाजव्यवस्थेविषयी नकार, विद्रोह, विज्ञाननिष्ठा या साहित्याच्या तत्वत्रयींचा ते स्वीकार करतात. डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी ज्या तऱ्हेने प्रस्थापित व्यवस्थेविरूद्‌ध विद्रोह पुकारला होता आणि तोच विद्रोह दलित कवितेत आला आहे. बाबुराव बागूल यांचा १९६७ साली प्रसिध्द झालेला छोटासा टंकमुद्रित 'विद्रोहाच्या कविता' हा कवितासंग्रह म्हणजे अस्पृश्यतेविरूद्‌धचा एक प्रचंड विद्रोह होता. ते एका कवितेत म्हणतात –

ज्यांनी चूक केली इथे जन्म घेण्याची

त्यांनीच ती सुधारली पाहिजे

देश सोडून अथवा भीषण युध्दे करून

येथल्या मातीशी, आदिम संस्कृतीशी जर अस्पृश्यांची नाळ जोडली गेली असेल तर देश का सोडायचा ? त्यापेक्षा दुसरा मार्ग योग्यच. त्या भीषण युध्दाचा आरंभ दलित कवितेने केला. ज्या व्यवस्थेने दलितांना पशूपेक्षाही हीन वागणूक दिली, कुत्र्यामांजरापेक्षाही तुच्छ लेखले, माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्कच हिरावून घेतला. त्या व्यवस्थेविरूद्‌ध क्रांतीची मशाल घेऊन लढण्यास सिध्द केले असे दलित कवीला वाटते. ही क्रांती फक्त दलित माणूसच करू शकेल अशा उपेक्षित, शोषित क्रांतीकारकाला बाबुराव बागूल सांगतात.

ती मशाल तेवढी घे

आणि त्या झोपडयांच्या वस्तीकडे जा

जसा येशू गेला तसा जा

नि तथागत बोलला तसाच बोलत रहा

कारण तिथे क्रांतीचा लाडका लेक

अस्पृश्य राहत असतो.

त्याला बघून सशस्त्र मनु  घाबरला होता.

गौतमबुध्द, येशू, महात्मा जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लढलेल्या समतेच्या लढयाला त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून आविष्कृत केले. ही अभिव्यक्ती कष्टकऱ्यांच्या 'माणूस' म्हणून जगण्याच्या उर्मीस साकार करणारी आहे. त्यांनी आपल्या कथातून शोषित वर्गातील नायक–नायिकाचे बंड रेखाटले. केवळ बंडच रेखाटले नाही तर त्यानी या नायकामध्ये विषमतावादी

वर्गव्यवस्थेमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य प्रदान केले. त्यांच्या 'विद्रोही' या कथेतील नायक जयचंदला शिकून खूप मोठे व्हावयाचे आहे. परंतु घरातील अठराविश्वे दरिद्रय, अंथरूणावर रोगाने जर्जर झालेला बाप आणि दिवसरात्र पोट भरण्यासाठी लोकांचा मैला डोक्यावरून वाहून नेत असताना हात मैलाने भरतात तसा तो किंचाळतो. 'आई माझी बोटे तोडून टाक' या किसळवाण्या अनुभवातून जयला आपली परिस्थिती व त्यास कारणीभूत असलेल्या व्यवस्थेशी ओळख अधिक तीव्र होते व तो या विषम समाजव्यवस्थेशी दोन हात करण्यास तयार होतो. त्यासाठी शिक्षणाचा वापर एखाद्या शस्त्राप्रमाणे करतो. यातून शिक्षणाचे महत्व सांगणारी आंबेडकरी प्रेरणा दिसून येते.

'सूड' ही दीर्घकथा केवळ दलितच नव्हे तर मराठी आणि एकूणच भारतीय साहित्य विश्वात एक अनमोल लेणे ठरली आहे. या कथेच्या माध्यमातून बागूलांनी भारतीय समाजवास्तवातील स्त्री–पुरूष संबंध, लैगिक शोषणास बळी पडलेल्या जान्हवीचा विद्रोह अतिशय प्रभावीपणे चितारला आहे. सूडच्या माध्यमातून समाजवास्तवाचा समृध्द जीवनरस घेऊन एखादी साहित्यकृती किती मोठया कलात्मक उंचीवर नेता येते हे दाखवून दिले.

'दलित साहित्याचे क्रांतिविज्ञान' या वैचारिक ग्रंथामधून त्यांनी वर्तमान समाजवास्तवाचे यथार्थ आकलन घडविले. याशिवाय त्यांच्या कोंडी, भूमीहीन, मूकनायक, अपूर्वा, सरदार, पावशा, पाषाण या कादंबऱ्या समाजपरिवर्तनाच्या मार्गातील मैलाचा दगड ठरल्या आहेत. त्याच्या साहित्याबद्दल कविश्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणतात – ''माणसाच्या जीवनातील सत्व, संघर्ष आणि सौंदर्य ही सर्व त्यांच्या साहित्यातून आविष्कृत होतात. ही तिन्ही जीवनमूल्ये बाबुराव बागूलांच्या साहित्यातून पहावयास मिळतात. बाबुराव बागूल यांनी मराठी साहित्याला मध्यमवर्गीय जीवन चित्रणातून बाजूला काढून दलित, कष्टकरी, आदिवासी, ग्रामीण स्त्रिया यांचे दु:खद जीवन हा आपल्या साहित्याचा विषय बनविले. मराठी साहित्याला ओढे, वनराई, सौदर्य यांच्या वर्णनातून बाहेर काढून जिवंत माणसांच्या अनुभवावर आधिष्ठित केले. त्यांनी खऱ्या अर्थाने मराठी साहित्याला गावकुसाबाहेरच्या वस्तीमध्ये नेले. आपल्या उत्तुंग प्रतिभेच्या जोरावर अनुभव व कल्पना यांचा अपूर्व मिलाफ साधून त्यांनी अक्षर साहित्यकृती निर्माण केल्या.''

**३. समारोप –**

बाबुराव बागूलांच्या साहित्यातील प्रतिमासृष्टी संपन्नपणे प्रकट झाली आहे. त्यांच्या प्रतिमांनी जीवनाचा अर्थ परिणामकारकपणे स्पष्ट केला आहे. त्यामागील जीवनवादी सौंदर्य उलगडून दाखविले आहे. शिरीष पै यांनी 'बागूलांची कथा मला एखाद्या चौकटीत न मावणाऱ्या आक्रमक चित्रासारखी वाटते.'' तर डॉ. नरेंद्र जाधव बागूलाच्या साहित्याविषयी म्हणतात – ''सर्वसामान्यपणे मराठी साहित्याच्या तुलनेत बागूलांच्या साहित्याचा दर्जा फार वरचा होता. बाबुरावांचे साहित्य इंग्रजीत अनुवादित झाले असते तर साहित्याचा नाबेल नक्कीच मिळालं असत पण इथे त्याची दखल हवी तशी घेतली गेली नाही''

**संदर्भ ग्रंथ :–**

*बाबुराव बागूल – जेव्हा मी जात चोरली होती अक्षर प्रकाशन सा.आ.पृ.१३–१४*

*डॉ. योगेंद्र मेश्राम – दलित साहित्य उदगम आणि विकास*

*बाबुराव बागूल – दलित साहित्यः आजचे क्रांतिविज्ञान*

*भालचंद्र फडके – दलित साहित्य वेदना व विद्रोह*

*मासिक – साष्टांग नमस्कार वर्ष १ ले अंक १ ला २००८ मधील बाबुराव बागूलांवरी लेख*

*डॉ. वि. अ. जोग – मार्क्सवाद आणि दलित साहित्य प्र. आ.१९८५ पृ. १७७*

*डॉ. नरेंद्र जाधव – महाराष्ट्र टाईम्स२७ मार्च २००८*